**<u>सं.फौज.केस क्रमांकः– ३७३/२०२१</u>**
**महाराष्ट्र शासन ..वि.. हेमराज**
**<u>निशाणी क्रमांकः– ९ खाली</u>**

साक्षीदार क्रमांक <u>२</u> अभियोग पक्षाकरीता
शपथेवर बयाण देतो की,

माझे नाव – **शकील करीम शेख,**
वय – ३६ वर्षे,
व्यवसाय – शेती,
राहणार – गांधी वार्ड लाखांदूर, ता. लाखांदूर, जि. भंडारा.

**<u>सरतपास – श्रीमती एस. व्ही. भेंडारकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत शपथेवर सुरू–</u>**

लाखांदूर पोलीसांनी मला ठाण्यामध्ये बोलावले होते. आम्ही ट्रॅक्टर घेवून पेट्रोल पंपावर गेलो होतो. आम्ही अपघात झालेली मोटारसायकल आमच्या ट्रॅक्टरमध्ये मांडली. त्यानंतर पो.स्टे. मध्ये नेवून सदरील गाडी आम्ही ठेवली. त्यानंतर पोलीसांनी माझी सही घेतली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर बरोबर आहे. घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष तयार करण्यात आला. त्यास **<u>निशाणी क्र.१४</u>** देण्यात येत आहे. तेथे गाडी, वाळू व रक्त जप्त करण्यात आले होते. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर बरोबर आहे. जप्ती पंचनाम्याला **<u>निशाणी क्र.१५</u>** देण्यात येत आहे. माझ्यासोबत दोनाडकर नावाचा द्वीतीय पंच होता. घटनास्थळाच्या चतुःसिमा मला सांगता येणार नाही.

**<u>उलटतपास आरोपीचे वकिल श्री. आर. जे. पिलारे यांचे मार्फत –</u>**

पोलीसांनी मला घटनास्थळ व जप्ती पंचनामे करणेकामी सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणने खरे आहे की, सदर दिवशी पेट्रोल भरण्यासाठी मी ट्रॅक्टर घेवून गेलो होतो. हे म्हणने खरे आहे की, मी त्या ट्रॅक्टरवर हमाल असल्याने ती गाडी भरण्यासाठी माझा ट्रॅक्टर बोलावला होता. अपघात गाडी ही टी.व्ही.एस. कंपनीची होती परंतू तिचा क्रमांक मला आठवत नाही. हे म्हणने खरे नाही की, घटनास्थळ व जप्ती पंचनामे पोलीसांनी पूर्वीच तयार करुन ठेवले होते. पोलीसांनी माझ्या कोऱ्या कागदावर सहया घेतल्या, त्या कागदावर वरती दोनचार नावे होती. हे म्हणने खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

**फेरतपास काही नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृती,

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2022.10.20 11:19:00 +0530

दिनांकः–१९/१०/२०२२

**(श्रीमती पूजा ना. कोकाटे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लाखांदूर